# राज्य परिवहन प्राधिकरण,
# महाराष्ट्र राज्य, मुंबई

अपर मुख्य सचिव (परिवहन) तथा अध्यक्ष, राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या कार्यालयीन दालनात दिनांक १८/०८/२०२५ रोजी दुपारी ०४.०० वाजता घेण्यात आलेल्या राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, यांच्या २७७ व्या बैठकीचे इतिवृत्त

सदर बैटकीस राज्य परिवहन प्राधिकरणाचे पुढे नमुद केल्याप्रमाणे अध्यक्ष व सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.संजय सेटी, भा.प्र.से. | अध्यक्ष,<br>राज्य परिवहन प्राधिकरण तथा,<br>अपर मुख्य सचिव, गृह विभाग (परिवहन),<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई. |
| २. | श्री. सुनिल भारद्वाज, भा.पो.से. | सदस्य,<br>राज्य परिवहन प्राधिकरण तथा,<br>अपर पोलीस महासंचालक(वाहतूक),<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई.<br>यांचे प्रतिनिधी |
| ३. | श्री. विवेक भीमनवार, भा.प्र.से. | सदस्य,<br>राज्य परिवहन प्राधिकरण, तथा,<br>परिवहन आयुक्त,<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई. |
| ४. | श्री. भरत कळसकर | सचिव,<br>राज्य परिवहन प्राधिकरण तथा,<br>अपर परिवहन आयुक्त,(अ.का.)<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई. |

**वाव क्रमांक:- १**

**विषय :- दिनांक २३.०१.२०२५ रोजी संपन्न झालेल्या राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या २७६ व्या बैठकीचे इतिवृत्तास मान्यता देण्याबाबत.**

दिनांक २३.०१.२०२५ रोजी घेण्यात आलेल्या राज्य परिवहन प्राधिकरणाच्या २७६ व्या बैटकीचे इतिवृत्तास मान्यता देऊन सदर इतिवृत्त प्राधिकरणाने कायम केले.

**बाब क्रमांक:- २**

**विषय :- विषय :- दिनांक २३.०१.२०२५ रोजी संपन्न झालेल्या राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या २७६ व्या बैठकीतील निर्णयांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या प्रगतीचा आढावा घेण्याबाबत.**

राज्य परिवहन प्राधिकरणाने दिनांक २३.०१.२०२५ रोजी घेण्यात आलेल्या प्राधिकरणाच्या २७६ व्या बैठकीतील निर्णयांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या प्रगतीचा आढावा सादर करण्यात आला.

**बाब क्रमांक :- ०३**

**विषय :- मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ७५ व रेंट ए कॅब स्किम १९८९ अंतर्गत मोटार कॅब्स भाडयाने देण्यासाठी मुख्य व शाखा कार्यालयाचे लायसेन्सचे नवीन लायसन्स जारी करणे व शाखा कार्यालयाचे रेन्ट-ए-कॅब लायसन्स नुतनिकरण करणेबाबत**

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी विषयसूचीचे अवलोकन केले.

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी वाहन भाडयाने घेणाऱ्या व्यक्तीची ओळख तपासण्याची पूर्ण जबाबदारी रेन्ट-ए-कॅब योजनेअंतर्गत मंजुर लायसन्स धारकाची राहिल या अटीवर पुढील प्रमाणे मुख्य व शाखा कार्यालयाचे नवीन रेन्ट-ए-कॅब लायसन्स जारी करणे व शाखा कार्यालयाचे रेन्ट-ए-कॅब लायसन्स नुतनिकरण करण्यास मान्यता दिली.

अ) मे. झुबीन्स रॉयल फ्लीट, बी ब्लॉक, ३५ सी, मंचर मंझील, जयराज भाय लेन, आर.एस.निमकर मार्ग, मुंबई-४०००८ यांना मुख्य/शाखा कार्यालयाचे "नवीन रेन्ट-ए-कॅब लायसन्स" पुढील पाच वर्षाकरीता जारी करण्यास मान्यता दिली.

ब) मे. वाईज ट्रॅव्हल इंडिया लि., ३०३, ३रा मजला, फेथ सेंटर, प्लॉट नं.८२, एस नं.२३२, साकोरे नगर, लोहगांव, विमान नगर, पुणे-४११०१४ यांना शाखा कार्यालयाचे "नवीन रेंट-ए-कॅब लायसन्स" मुख्य लायसन्सच्या वैधतेपर्यंत जारी करण्यास मान्यता दिली.

क) मे. प्राईम मुव्हर मोबॅलिटी टेक्नोलॉजी प्रा. लि., सि.एस.नं.५५३० ए, कोलेकल्याण व्हिलेज, सिएसटी रोड, कलिना, एल अँड टी फायनान्सच्या पुढे, सेंट्रल बँक ऑफ इंडिया समोर, सांताक्रुज (पूर्व), मुंबई-४०००९८ यांचे शाखा कार्यालयाचे रेंट-ए-कॅब लायसन्स क्र. 17/RENT-A-CAB/LICENCE/STA/2017 वैधता पुढील पाच वर्षाकरिता (मुख्य लायसन्सच्या वैधतेपर्यंत) "नुतनीकरण" करण्यास मान्यता दिली.

**(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक १८/०८/२०२५ ठराव क्र. १०/२०२५)**

**बाब क्रमांक :- ०४**

**विषय :- मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ७५ व रेंट-ए-मोटर सायकल स्किम, १९९७ अंतर्गत मोटार सायकल भाडयाने देण्यासाठी लायसेन्स मिळणेबाबत**

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी विषयसूचीचे अवलोकन केले.

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी वाहन भाडयाने घेणाऱ्या व्यक्तीची ओळख तपासण्याची पूर्ण जबाबदारी रेन्ट-ए-मोटार सायकल योजनेअंतर्गत मंजुर लायसन्स धारकाची राहिल या अटीवर पुढील प्रमाणे संबंधित उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पेण यांच्या कार्यक्षेत्रापुरते नवीन रेन्ट-ए- मोटार सायकलचे लायसन्स पाच वर्षाकरीता प्रदान करण्यास मान्यता दिली.

१) श्री. राकेश संजय बैकर, नागेश को.ऑ.हौ.सो., तळ मजला, शॉप नं. २०, अलिबाग नगरपरिषद प्रॉपर्टी नं.१५४० बी, विंग ए, ता.अलिबाग, जि.रायगड यांना उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पेण यांच्या कार्यक्षेत्रापुरते "नवीन रेन्ट-ए- मोटार सायकल" चे लायसन्स पाच वर्षाकरीता प्रदान करण्यास मान्यता दिली.

२) श्रीमती प्रमिला संजय बैकर, शॉप नं.०४, सी व्यू अपार्टमेंट, चावडी मोहोला, अलिबाग, ता.अलिबाग. जि.रायगड यांना उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पेण यांच्या कार्यक्षेत्रापुरते "नवीन रेन्ट-ए- मोटार सायकल" चे लायसन्स पाच वर्षाकरीता प्रदान करण्यास मान्यता दिली.

**(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक १८/०८/२०२५ ठराव क्र. ११/२०२५)**

**बाब क्रमांक :- ५**

**विषय :- महाराष्ट्र-मध्यप्रदेश व महाराष्ट्र-मध्यप्रदेश राज्य यांच्यामध्ये झालेल्या परस्पर वाहतूक करारांतर्गत समाविष्ट असलेल्या आंतरराज्यीय मार्गांवर टप्पा वाहतूक करण्यासाठी खाजगी वाहतूकदारांना जारी केलेल्या स्थायी टप्पा परवाना व मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम ८७(१)(C) मधील तरतूदीनुसार जारी करण्यात येणाऱ्या तात्पुरत्या परवान्यांबाबत**

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी विषयसूचीचे अवलोकन केले.

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी मा. उच्च न्यायालय, जबलपूर मध्यप्रदेश येथे

रिटयाचिका क्र. १६४५३/२०१९ मध्ये दिनांक २३.०९.२०१९ रोजी पारीत केलेले आदेश, मा. उच्च न्यायालय, मध्यप्रदेश, जबलपूर यांनी रिट याचिका क्रमांक २४०८५/२०२४ मध्ये दि.०२.११.२०२४ रोजी पारीत केलेले आदेश व मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांनी रिट याचिका क्र.२९०२३/२०२४ मध्ये दि. १८.१२.२०२४ रोजी पारीत केलेले आदेश तसेच, मा. उच्च न्यायालय, जबलपूर मध्यप्रदेश यांनी रिटयाचिका क्र. ४०६०/२०२३ मध्ये दिनांक ०८.०९.२०२३ रोजी पारीत केलेले आदेश व मा. उच्च न्यायालय, मध्यप्रदेश, खंडपीठ, जबलपूर यांनी अवमान याचिका क्र. ४०६७/२०२४ मध्ये दिनांक ०४.०८.२०२५ रोजी पारीत केलेले आदेश यांचे अवलोकन केले.

**(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक १८/०८/२०२५ ठराव क्र. १२/२०२५)**

**वाव क्रमांक :- ६**

**विषय :- ‘‘महाराष्ट्र बाईक - टॅक्सी नियम,२०२५’’ अंतर्गत सेवा देणाऱ्या इलेक्ट्रिक दुचाकी वाहनांचे भाडेदर ठरविणेबाबत**

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी विषयसूचीचे अवलोकन केले.

१) राज्य परिवहन प्राधिकरणाने सर्व बाबींचे अवलोकन करुन सखोल चर्चा केली. सखोल चर्चेअंती ‘‘महाराष्ट्र बाईक - टॅक्सी नियम,२०२५’’ अंतर्गत राज्यात सेवा देणाऱ्या इलेक्ट्रिक दुचाकी वाहनांचे भाडेदर राज्यात प्रथमत: करण्यात येत आहे. राज्यात सदर भाडेदरामध्ये एकसूत्रता / समानता असण्यासाठी मा. खटुआ समितीने ऑटोरिक्षाचे भाडेदर टरविण्यासाठी निश्चित केलेली पध्दत विचारात घेऊन ‘‘महाराष्ट्र बाईक - टॅक्सी नियम,२०२५’’ अंतर्गत राज्यात सेवा देणाऱ्या इलेक्ट्रिक दुचाकी वाहनांचे भाडेदर प्रति कि.मी. रु. १०.२७ व पहिला टप्पा (१.५ कि.मी.) किमान देय भाडे रु.१५/- प्रमाणे आकारणी करण्यास राज्य परिवहन प्राधिकरणाने मान्यता दिली.

तसेच, प्राधिकरणाने सदर नियमांतर्गत सेवा देणाऱ्या दुचाकी वाहनांचे उपरोक्तप्रमाणे निश्चित केलेले भाडेदर संपूर्ण राज्यासाठी लागू राहील. तदनंतर सदर भाडेदराचा पुनर्विचार १ वर्षानंतर करण्यात येईल. तसेच, सदर निर्णय सर्व प्रादेशिक परिवहन प्राधिकरणांना कळविण्याचे निर्देश राज्य परिवहन प्राधिकरणाने दिले.

**(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक १८/०८/२०२५ ठराव क्र. १३/२०२५)**

**बाब क्रमांक :- ७**

**विषय :- वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन, वापर व वाहतूक करणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम ८६ मधील तरतूदीनुसार विभागीय कारवाई करणेबाबत**

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी विषयसूचीचे अवलोकन केले.

सखोल चर्चेअंती महाराष्ट्र शासनाने शासन अधिसूचना क्रमांक एमव्हीआर-०९१९/प्र.क्र.२००/परि-२ दिनांक २६.११.२०२१ रोजीच्या अधिसूचनेद्वारे निश्चित केलेले तडजोड शुल्कच आकारण्यास राज्य परिवहन प्राधिकरणाने ठराव क्र. १२/२०२१ अन्वये मान्यता दिली व त्याच बरोबर मालवाहतूक करतांना ओव्हरलोड वाहतूक झाल्याचे मोटार वाहन विभागाचे अधिकाऱ्यांचे निर्दशनास आल्यावर संबंधितांवर *"The Prevention of Damage to Public Property Act, 1984"*कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यासाठी संबंधित रस्त्याची मालकी असलेल्या संस्था / विभाग (उदा. NHAI / PWD/ MSRDC / ZP / Municipal Corporation / Municipal Council, इ.) यांना कळविण्यात यावे असे निर्देश राज्य परिवहन प्राधिकरणाने दिले.

उपरोक्त प्रमाणे विभागीय कारवाई बरोबर वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन, वापर. व अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांवर आळा घालण्यासाठी व राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या कामकाजात समानता राहण्याच्या दृष्टीने तसेच राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन प्राधिकरणांच्या धोरणामध्ये एकसूत्रता आणण्यासाठी राज्यात वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन, वापर, व अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांचे परवान्यावर मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ८६ मधील तरतूदीनुसार विभागीय कारवाई करण्यासाठी राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन प्राधिकरणांनी पुढीलप्रमाणे निर्णय घेण्याचे निर्देश राज्य परिवहन प्राधिकरणाने दिले.

| गुन्हयाचे स्वरुप | विभागीय कारवाई | | |
|---|---|---|---|
| | पहिला गुन्हा | दुसरा गुन्हा | तिसरा गुन्हा |
| राज्यात वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन करुन अवैधपणे वाहतूक करणारी वाहने | ३० दिवस परवाना निलंबित व वाहन अटकावून ठेवणे | ६० दिवस परवाना निलंबित व वाहन अटकावून ठेवणे | वाहन अटकाव करुन परवाना रद्द करण्यासाठी संबंधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरणामार्फत कार्यवाही करणे |

**(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक १८/०८/२०२५ ठराव क्र. १४/२०२५)**

**बाब क्रमांक :- ८**

**विषय :- महाराष्ट्र बाईक - टॅक्सी नियम, २०२५ अंतर्गत सेवा देणाऱ्या ॲग्रीगेटरधारकांना लायसेन्स देणेबाबत**

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी विषयसूचीचे अवलोकन केले.

मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) चे कलम ७३ व ७४ अन्वये तसेच महाराष्ट्र राज्यात लागू असलेले इतर सर्व सक्षमता प्रदान करणाऱ्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने दिनांक ०४.०७.२०२५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र बाईक-टॅक्सी नियम, २०२५ लागू केले आहेत.

महाराष्ट्र शासनाने दिनांक १९.०१.२०२३ रोजीच्या अधिसूचनेद्वारे खाजगी संवर्गातील दुचाकी वाहनांच्या समुच्चयनाच्यासाठी वापर करण्यास प्रतिबंधित केले आहे. तरीसुध्दा काही कंपन्या ॲपच्या माध्यमातून बेकायदेशीरपणे खाजगी दुचाकी वाहनांद्वारे अवैध प्रवासी वाहतूक करताना आढळून आल्याने काही समुच्चयनांच्या विरोधात आझाद मैदान पोलीस ठाणे, समता नगर, पोलीस ठाणे व अंबोली पोलीस ठाणे येथे FIR दाखल करण्यात आले आहेत. तसेच, मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या क्षेत्रामध्ये अवैध व बेकायदेशीरपणे खाजगी दुचाकी प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात आली. ही बाब राज्य परिवहन प्राधिकरणासमोर सादर करण्यात आली.

श्री. अमरजित गुप्ता व इतर यांनी महाराष्ट्र शासन व इतर यांच्या विरुध्द मा. उच्च न्यायालय , मुंबई येथे जनहित याचिका (स्टॅम्प) क्र. २५६६०/२०२५ दाखल केली आहे. सदर याचिकेमध्ये याचिकाकर्ते खाजगी संवर्गातील दुचाकी वाहनांद्वारे अवैधरित्या वाहतूक विरोधात कारवाई करण्याबाबत मागणी केली आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने दिनांक ०४.०७.२०२५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र बाईक-टॅक्सी नियम, २०२५ लागू केले आहेत. त्याअर्थी, अवैध दुचाकी प्रवासी वाहतूकीवर निर्बंध आणण्यासाठी सदर नवीन नियमाची अंमलबजावणी तात्काळ होणे आवश्यक आहे. अवैध दुचाकी प्रवासी वाहतूकीवर निर्बंध आणण्यासाठी व प्रवाशांच्या सुरक्षितेसाठी सदर नियममांतर्गत लायसन्स मिळण्यासाठी अर्ज करणाऱ्या अर्जदारांना नियमानुसार लायसन्स देणेची बाब प्राधिकरणासमोर सादर करण्यात आली. सदर नियमांतर्गत विहित अटी व शर्तींची पुर्तता करणाऱ्या अर्जदारांना लायसन्स जारी केल्यास अवैधपणे होणारी खाजगी दुचाकी प्रवासी वाहतूकीस आळा बसण्यास मदत होईल. तसेच, लायसन्सप्राप्त समुच्यकांना राज्य परिवहन प्राधिकरणाने मान्यता प्राप्त भाडेदर, प्रवाशांची सुरक्षितेचे नियम, चालकांना मिळणारे कमीत कमी भाडे, प्रवाशांना आकारवायाचे कमीत कमी व जास्तीचे भाडेचे निर्बंध व इतर नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील असे प्राधिकरणाचे मत झाले.

सदर नियमांतर्गत ॲग्रीगेटरचे लायसन्स मिळण्याकरीता पुढील प्रमाणे अर्जदारांनी अर्ज सादर केले

आहेत.

१) मे. उबेर इंडिया सिस्टीम प्रा.लि., २) मे. रोपेन ट्रान्सपोर्टेशन सर्व्हिसेस प्रा.लि., ३) मे. ॲनी टेक्नोलॉजीसेस प्रा.लि.,४) मे.स्मार्ट - राईड

अर्जदारांनी महाराष्ट्र बाईक-टॅक्सी नियम, २०२५ मधील सर्व परिच्छेद मुद्यांची / तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने लायसन्स मिळण्याकरीता प्राप्त झालेल्या अर्जांवर सविस्तर चर्चा करुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

**१)** मे. ॲनी टेक्नोलॉजीसेस प्रा.लि.,यांनी महाराष्ट्र बाईक-टॅक्सी नियम, २०२५ अंतर्गत ॲग्रीगेटरचे लायसन्स मिळण्यसाठी दिनांक २५.०७.२०२५ रोजी विहित शुल्क रु.१,००,०००/- भरणा करुन अर्ज सादर केला आहे. सदर अर्जदार सदर नियमातील तरतूदींची पूर्तता करण्यात येते किंवा नाही याबाबतची तपासणी करण्यास संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पश्चिम) यांना दिनांक २९.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले.

किमान ५० इलेक्ट्रिक दुचाकी वाहने परिवहन संवर्गात नोंदणी करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालयात अर्जदार कंपनीने सादर केली आहेत. महाराष्ट्र शासनाने दिनांक १९.०१.२०२३ रोजीच्या अधिसूचनेद्वारे खाजगी संवर्गातील दुचाकी वाहनांना समुच्चयनासाठी वापर करण्यास प्रतिबंधित केले आहे. अर्जदार मे. ॲनी टेक्नोलॉजीसेस प्रा.लि.,यांनी किमान ५० इलेक्ट्रिक दुचाकी वाहने परिवहन संवर्गात नोंदणी तसेच, महाराष्ट्र बाईक-टॅक्सी नियम, २०२५ मधील सर्व परिच्छेद मुद्यांची / तरतुदींची पुर्तता १ महिन्यात आत करण्यात येईल याबाबतचे प्रतिज्ञापत्र दिले आहे.

राज्य परिवहन प्राधिकरणाने उपरोक्त सर्व बाबींची नोंद घेऊन अर्जदार महाराष्ट्र बाईक-टॅक्सी नियम, २०२५ मधील तरतूदीनुसार अर्जदाराने खाजगी दुचाकी वाहनांद्वारे प्रवासी वाहतूक करता कामा नये व उर्वरित सर्व बाबींची पुर्तता १ महिन्याच्या आत करण्याच्या अटी वर अर्जदार मे. ॲनी टेक्नोलॉजीसेस प्रा.लि.,यांना ३० दिवसाकरीता "मुंबई महानगर क्षेत्राकरीता" Provisional Licence जारी करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली. तसेच, अर्जदाराकडून ३० दिवसाच्या आत सर्व बाबींची / अटींची पूर्तता झाल्यानंतर पक्के लायसन्स प्रदान करण्याच्या अंतिम मान्यतेसाठी राज्य परिहवन प्राधिकरणासमोर सादर करण्याचे निर्देश प्राधिकरणाने दिले.

**२)** मे. उबेर इंडिया सिस्टीम प्रा.लि., यांनी दिनांक १५.०७.२०२५ रोजी महाराष्ट्र बाईक-टॅक्सी नियम, २०२५ अंतर्गत ॲग्रीगेटरचे लायसन्स मिळण्यसाठी धनादेशाद्वारे विहित शुल्क रु.१,००,०००/- भरणा करुन अर्ज सादर केला आहे. सदर अर्जदार सदर नियमातील तरतूदींची पूर्तता करण्यात येते किंवा नाही याबाबतची तपासणी

करण्यास संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व), पुणे व नागपूर (शहर) यांना दिनांक २९.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले.

किमान ५० इलेक्ट्रिक दुचाकी वाहने परिवहन संवर्गात नोंदणी करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालयात सादर केली आहेत. महाराष्ट्र शासनाने दिनांक १९.०१.२०२३ रोजीच्या अधिसूचनेद्वारे खाजगी संवर्गातील दुचाकी वाहनांना समुच्चयनासाठी वापर करण्यास प्रतिबंधित केले आहे. अर्जदार मे. उबेर इंडिया सिस्टीम प्रा.लि.यांनी किमान ५० इलेक्ट्रिक दुचाकी वाहने परिवहन संवर्गात नोंदणी तसेच, महाराष्ट्र बाईक-टॅक्सी नियम, २०२५ मधील सर्व परिच्छेद मुद्यांची / तरतुदींची पुर्तता १ महिन्यात आत करण्यात येईल याबाबतचे प्रतिज्ञापत्र दिले आहे.

राज्य परिवहन प्राधिकरणाने उपरोक्त सर्व बाबींची नोंद घेऊन अर्जदार महाराष्ट्र बाईक-टॅक्सी नियम, २०२५ मधील तरतूदीनुसार अर्जदाराने खाजगी दुचाकी वाहनांद्वारे प्रवासी वाहतूक करता कामा नये व उर्वरित सर्व बाबींची पुर्तता १ महिन्याच्या आत करण्याच्या अटी वर अर्जदार मे. उबेर इंडिया सिस्टीम प्रा.लि.यांना ३० दिवसाकरीता "मुंबई महानगर क्षेत्राकरीता" Provisional Licence जारी करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली. तसेच, अर्जदाराकडून ३० दिवसाच्या आत सर्व बाबींची / अटींची पूर्तता झाल्यानंतर पक्के लायसन्स प्रदान करण्याच्या अंतिम मान्यतेसाठी राज्य परिहवन प्राधिकरणासमोर सादर करण्याचे निर्देश प्राधिकरणाने दिले.

**३)** मे. रोपेन ट्रान्सपोर्टेशन सर्व्हिसेस प्रा.लि. यांनी दिनांक ०१.०८.२०२५ रोजी महाराष्ट्र बाईक-टॅक्सी नियम, २०२५ अंतर्गत ॲग्रीगेटरचे लायसन्स मिळण्यासाठी दिनांक ०६.०८.२०२५ रोजी ग्रास प्रणालीवर विहित शुल्क रु.१,००,०००/- भरणा करुन अर्ज सादर केला आहे. सदर अर्जदार सदर नियमातील तरतूदींची पूर्तता करण्यात येते किंवा नाही याबाबतची तपासणी करण्यास संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) यांना दिनांक ०१.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले.

किमान ५० इलेक्ट्रिक दुचाकी वाहने परिवहन संवर्गात नोंदणी करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालयात सादर केली आहेत. महाराष्ट्र शासनाने दिनांक १९.०१.२०२३ रोजीच्या अधिसूचनेद्वारे खाजगी संवर्गातील दुचाकी वाहनांना समुच्चयनासाठी वापर करण्यास प्रतिबंधित केले आहे. अर्जदार मे. रोपेन ट्रान्सपोर्टेशन सर्व्हिसेस प्रा.लि. यांनी किमान ५० इलेक्ट्रिक दुचाकी वाहने परिवहन संवर्गात नोंदणी तसेच, महाराष्ट्र बाईक-टॅक्सी नियम, २०२५ मधील सर्व परिच्छेद मुद्यांची / तरतुदींची पुर्तता १ महिन्यात आत करण्यात येईल याबाबतचे प्रतिज्ञापत्र दिले आहे.

राज्य परिवहन प्राधिकरणाने उपरोक्त सर्व बाबींची नोंद घेऊन अर्जदार महाराष्ट्र बाईक-टॅक्सी नियम, २०२५ मधील तरतूदीनुसार अर्जदाराने खाजगी दुचाकी वाहनांद्वारे प्रवासी वाहतूक करता कामा नये व उर्वरित सर्व बाबींची पुर्तता १ महिन्याच्या आत करण्याच्या अटी वर अर्जदार मे. रोपेन ट्रान्सपोर्टेशन सर्व्हिसेस प्रा.लि. यांना ३० दिवसाकरीता "मुंबई महानगर क्षेत्राकरीता" Provisional Licence जारी करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली. तसेच, अर्जदाराकडून ३० दिवसाच्या आत सर्व बाबींची / अटींची पूर्तता झाल्यानंतर पक्के लायसन्स प्रदान करण्याच्या अंतिम मान्यतेसाठी राज्य परिहवन प्राधिकरणासमोर सादर करण्याचे निर्देश प्राधिकरणाने दिले.

४) मे.स्मार्ट - राईड यांनी महाराष्ट्र बाईक-टॅक्सी नियम, २०२५ अंतर्गत लायसन्स मिळण्यासाठी अर्जासोबत विहित शुल्क, सुरक्षा ठेव रक्कम, किमान ५० इलेक्ट्रिक दुचाकी वाहने परिवहन संवर्गात नोंदणी असलेली वाहने, तसेच, नियंत्रण कक्ष, विमा प्रमाणपत्र, गॅरेज पार्किंग, चार्जिंग पाईंट, चालकांची माहिती, इलेक्ट्रिक दुचाकी वाहनांचा पिवळा रंग, चालकांकडे परिवहन संवर्गातील अनुज्ञप्ती, चालक व मालकांचे चारित्र्य पडताळणी अहवाल, लॉक बुक, भाडेदर मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र, या सर्व आवश्यक असलेल्या बाबींची पुर्तता अर्जदाराने केलेली नाही. राज्य परिवहन प्राधिकरणाने यासर्व बाबींची नोंद घेऊन अर्जदार मे.स्मार्ट - राईड यांचा अर्ज नामंजूर करण्याचा निर्णय घेतला.

**(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक १८/०८/२०२५ ठराव क्र. १५/२०२५)**

**अतिरिक्त बाब क्रमांक :- १**
**विषय :-** महाराष्ट्र राज्यात ॲप बेस वाहनांसाठी समुच्चक धोरण (Aggregetors Policy) लागू करणेबाबत

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी विषयसूचीचे अवलोकन केले.

शासनाने शासन निर्णय क्रमांक एमव्हीआर-०८२१/प्र.क्र.९५/परि-२ दिनांक २०.०५.२०२५ अन्वये महाराष्ट्र राज्यात ॲप बेस वाहनांसाठी समुच्चक धोरण (Aggregetors Policy) लागू करण्यास मान्यता दिली. त्याचे नियम अंतिम करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

शासनाने सदर शासन निर्णयान्वये समुच्चक धोरण (Aggregetors Policy) मध्ये विविध अटी व शर्ती नमूद केल्या आहेत. सदर अटी व शर्तीमध्ये पुढीलप्रमाणे अट नमूद आहे.

१) दर व अंतर - ऑटोरिक्षा / कॅब याकरीता प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने निश्चित केलेले दर हे आधार दर असतील. मीटर टॅक्सींना अन्यायकारक स्पर्धेचा सामना करावा लागू नये यासाठी मागणी कमी असलेल्या वेळेत

देण्यात येणाऱ्या सूटीचा दर हा फेरीच्या २५% इतका मर्यादीत करण्यात यावा. तसेच जास्त मागणी असलेल्या वेळेत दर १.५ पटीपेक्षा जास्त नसावेत. किमान फेरीचे अंतर ३ कि.मी. असावे.

२) चालकांसाठी दर - चालकांना एकूण भाडेदराच्या किमान ८० टक्के रक्कम मिळावी.”

शासनाने दिनांक २०.०५.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये ॲप बेस वाहनांसाठी समुच्चक धोरण (Aggregetors Policy) लागू करण्यास मान्यता दिली तसेच त्यामधील विविध अटी व शर्तीची नोंद राज्य परिवहन प्राधिकरणाने घेतली. याबाबत चर्चा करुन महाराष्ट्र राज्यात ॲपबेस वाहनांचे भाडेदर निश्चित करण्याबाबत वाहनांच्या किंमतीनुसार प्रस्ताव राज्य परिवहन प्राधिकरणाच्या पुढील बैठकित सादर करण्याचे निर्देश प्राधिकरणाने दिले.

**(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक १८/०८/२०२५ ठराव क्र. १६/२०२५)**

**श्री. भरत कळसकर**
**सचिव,**
**राज्य परिवहन प्राधिकरण**
**तथा अपर परिवहन आयुक्त,(अ.का.)**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**श्री. विवेक भीमनवार (भा.प्र.से)**
**सदस्य,**
**राज्य परिवहन प्राधिकरण,**
**तथा परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**श्री. सुनिल भारद्वाज, (भा.पो.से.)**
**सदस्य,**
**राज्य परिवहन प्राधिकरण**
**तथा पोलीस अधीक्षक (वाहतूक),**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**
**यांचे प्रतिनिधी**

**श्री. संजय सेठी,(भा.प्र.से)**
**अध्यक्ष,**
**राज्य परिवहन प्राधिकरण,**
**तथा अपर मुख्य सचिव, गृह विभाग (परिवहन),**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**